# घोडेगाव येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. यांचे कोर्टात

रे.मु.नं. /2025

**गिरजाबाई सिताराम आदक**
वय 82 वर्ष, धंदा - शेती,
रा.वाळुंजनगर पो.लोणी,
ता.आंबेगाव, जि.पुणे. ......वादी

विरूध्द

1. **श्री. आप्पा नामदेव वाळुंज**
   वय 45 वर्षे, धंदा - शेती,
2. **श्री. संतोष पोपट वाळुंज**
   वय 45 वर्षे, धंदा - शेती,
3. **श्री. कांताराम पोपट वाळुंज**
   वय 38 वर्षे, धंदा - शेती,
4. **श्रीमती आशा पोपट वाळुंज**
   वय 46 वर्षे, धंदा - शेती,
5. **सविता संतोष टेमकर**
   वय 41 वर्षे, धंदा - शेती,
6. **सुगंधा पोपट वाळुंज**
   वय 68 वर्षे, धंदा - शेती,
   सर्व रा.वाळुंजनगर पो.लोणी, ता.आंबेगाव, जि.पुणे.
7. **श्री. राजाराम वामन वाळुंज**
   वय 67 वर्ष, धंदा - शेती,

......प्रतिवादी

8. **श्री. गुलाब वामन वाळुंज**

वय 65 वर्ष, धंदा - शेती,

नं.7 व 8 दोघेही रा.खडकवाडी, ता.आंबेगाव, जि.पुणे.

9. **श्री. रंगनाथ विष्णु लंके**

वय 60 वर्ष, धंदा - शेती,

10. **श्री. बाळासाहेब विष्णु लंके**

वय 58 वर्ष, धंदा - शेती, ......प्रतिवादी

11. **श्री. उत्तम विष्णु लंके**

वय 55 वर्ष, धंदा - शेती,

नं.9 ते 11 सर्व रा. लोणी, ता.आंबेगाव, जि.पुणे.

12. **वंदना चंद्रकांत गावडे**

वय 52 वर्ष, धंदा - शेती,

रा.पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे.

## दावा ठरावाचा व निरंतर ताकीद मनाई हुकुमाचा दावा विषय रू.2000/- किंमतीचा


1. **मिळकतीचे वर्णन** - तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका आंबेगाव, मे. दुय्यम निबंधक सो. आंबेगाव यांचे हद्दीतील, तसेच गाव मौजे खडकवाडी, ता.आंबेगाव, जि.पुणे. येथील शेतजमीन मिळकत त्यासी क्षेत्र, आकार पुढीलप्रमाणे

| अनु. क्र. | गट नं. | | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| | | | हे.आर. | रू.पै. |
| 1. | 121 | | 5/54 | 8/30 |
| | | पो.ख. | 0/37 | |
| | | एकुण | 5/91 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | 125 | 1/09 | 2/21 |
| | | पो.ख. 0/01 | |
| | | एकुण 1/10 | |

येणेप्रमाणे शेतजमीन त्यातील झाडझाडोरा, दगड, माती, तृण, काष्ट, पाषान वगैरे तदंगभूत वस्तूंसहीत शेतजमीन या दाव्याचा विषय असे.

2. **वादी व प्रतिवादी यांचा कारणापुरता वंशवेल**




वरील वंशवेलानुसार वादी व प्रतिवादी यांचे कुटुंबाचे मुळ पुरूष तुकाराम भाऊ वाळुंज हे असून सदर तुकाराम वाळुंज यांचे दिनांक 04/02/1959 रोजी निधन झाले असून त्यांना वारस मुले तीन नामे बाळा तुकाराम वाळुंज, वामन तुकाराम वाळुंज व नामदेव तुकाराम वाळुंज हे असून सदर तिनही मुले मयत असून बाळा तुकाराम वाळुंज

यांना वारस मुली तीन नामे शांताबाई नाथु गायकवाड, जयवंताबाई दौलत गायकवाड व वच्छला बाळा वाळुंज व मुलगा एक नामे पोपट बाळा वाळुंज हे वारस आहेत. सदर पोपट बाळा वाळुंज यांचेदेखील दिनांक 09/01/2021 रोजी निधन झाले असून त्यांना वारस मुले दोन नामे संतोष व कांताराम व मुली दोन नामे आशा, सविता व पत्नी सुगंधा ही आहेत. सदर वामन तुकाराम वाळुंज यांचेदेखील निधन झाले असून त्यांना वारस मुले दोन नामे राजाराम व गुलाब तसेच मुली दोन नामे गिरजाबाई सिताराम आदक व हौसाबाई विष्णु लंके हे वारस असून सदर हौसाबाई विष्णु लंके यांचे निधन झाले असून त्यांना वारस मुले तीन नामे रंगनाथ विष्णु लंके, बाळासाहेब विष्णु लंके व उत्तम विष्णु लंके व मुलगी एक नामे वंदना चंद्रकांत गावडे हे वारस आहेत. सदर नामदेव तुकाराम वाळुंज यांचेदेखील निधन झाले असून त्यांना वारस मुलगा एक नामे आप्पा तसेच मुली पाच नामे मिराबाई जयवंत चौधरी, सुरेखा गोरक्ष तांबे, अलका रामचंद्र दंडवते, सुनिता सुरेश मांदळे व रोहिणी गणेश गोरडे हे वारस आहेत.

3. सदर गाव मौजे लोणी, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील जमीन सर्वे नं.21/3 यांसी क्षेत्र 9 एकर 28 गुंठे + पो.ख. 0 एकर 08 गुंठे एकुण 10 एकर 18 गुंठे, सर्वे नं.22/13 क्षेत्र 4 एकर 03 गुंठे + पो.ख. 0 एकर 07 गुंठे एकुण 4 एकर 10 गुंठे, सर्वे नं.22/7 पैकी क्षेत्र 2 एकर 15 गुंठे या जमीन मिळकती पुर्वी सखाराम शंकर होनराव, सुधाकर शंकर होनराव, पार्वताबाई को शंकर होनराव स्वता व अ.पा.क. म्हणून मुलगा संदीप शंकर होनराव, मुलगी विद्यावती शंकर होनराव व विमल आनंदराव आर्वीकर यांचे मालकीच्या होत्या व त्यांचे नावे 7/12 सदरी मालकीहक्काने दाखल होत्या.

4. सदर सखाराम शंकर होनराव, सुधाकर शंकर होनराव, पार्वताबाई को शंकर होनराव स्वता व अ.पा.क. म्हणून मुलगा संदीप शंकर होनराव, मुलगी विद्यावती शंकर होनराव व विमल आनंदराव आर्वीकर यांनी त्यांचे मालकीच्या गाव मौजे लोणी, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील जमीन सर्वे नं.21/3 यांसी क्षेत्र 9 एकर 28 गुंठे + पो.ख. 0 एकर 08 गुंठे एकुण 10 एकर 18 गुंठे, सर्वे नं.22/13 क्षेत्र 4 एकर 03 गुंठे + पो.ख. 0 एकर 07 गुंठे एकुण 4 एकर 10 गुंठे, सर्वे नं.22/7 पैकी क्षेत्र 2 एकर 15 गुंठे या जमीन मिळकती

दिनांक 22 ऑक्टोबर 1959 रोजी वादी व प्रतिवादी नं.7 व 8 यांचे वडील व प्रतिवादी नं. 9 ते 12 यांची आई कै. हौसाबाई विष्णु लंके हिचे वडील वामन तुकाराम वाळुंज यांना रक्कम रूपये 1500/- किंमतीस खरेदी दिल्या. सदर खरेदीखताचा दस्त मे. दुय्यम निबंधक सो. आंबेगाव यांचे कार्यालयात दस्त नं.1009/1959 अन्वये नोंदणीकृत असून सदर खरेदीखतानुसार वामन तुकाराम वाळुंज यांचे नावाची नोंद फेरफार नोंद नं.6738 अन्वये दाखल करण्यात आले.

5. सदर खरेदी जमीनीस गटवारीनंतर गट नं.382 क्षेत्र 5 हे. 54 आर + पो.ख. 0 हे. 37 आर आकार 8 रू. 30 पैसे व गट नं.386 क्षेत्र 1 हे. 09 आर + पो.ख. 0 हे. 01 आर आकार 2 रू. 21 पैसे असे गट पडले व त्यानंतर वाडीविभाजनानंतर खडकवाडी हे गाव अस्तित्वात येवून गट नं.121 क्षेत्र 5 हे. 54 आर + पो.ख. 0 हे. 37 आर आकार 8 रू. 30 पैसे व गट नं.125 क्षेत्र 1 हे. 09 आर + पो.ख. 0 हे. 01 आर आकार 2 रू. 21 पैसे असे नविन गट नंबर पडले आहेत.

6. सदर प्रतिवादी नं.1 ते 6 यांचा दावा जमीनीशी कोणताही हक्क व हितसंबंध नाही. सदर वादी नं.1 व प्रतिवादी नं.7 व 8 यांचे व प्रतिवादी नं. 9 ते 12 यांची आई कै. हौसाबाई विष्णु लंके हिचे वडील वादी नं.2 ते 5 यांचे आजोबा वामन तुकाराम वाळुंज यांचे दिनांक 27/06/1962 रोजी निधन झाल्यानंतर त्यांची वारसनोंद होताना अपील मिळकतीस व इतर वडीलार्जीत जमीन मिळकतीस मुले राजाराम व गुलाब, मुली गिरजाबाई सिताराम आदक व हौसाबाई विष्णु लंके व बायको शांताबाई वामन वाळुंज यांची नावे वारस म्हणून नमुद करून ए.कु.मॅ. म्हणून नामदेव तुकाराम वाळुंज यांचे नावाची नोंद फेरफार नोंद नं.7386 अन्वये दाखल करण्यात आली व त्यानंतर नामदेव तुकाराम वाळुंज यांनी अर्ज दिलेवरून दावा मिळकत व इतर वडीलार्जीत मिळकतीस नामदेव तुकाराम वाळुंज यांना 0/33 पैसे, पोपट बाळा वाळुंज यांना 0/33 पैसे व राजाराम वामन वाळुंज यांना 0/17 पैसे व गुलाब वामन वाळुंज यांना 0/17 पैसे अशी आणेवारी फेरफार नोंद नं.668 अन्वये दाखल करण्यात आली. मुळात सदर दावा मिळकतीशी नामदेव तुकाराम वाळुंज व पोपट बाळा वाळुंज यांचा कोणत्याही प्रकारे संबंध नव्हता व नाही. सबब

त्यांना दावा मिळकतीस आणेवारी लावणेकामी अर्ज करणेचा कोणताही कायदेशिर हक्क व अधिकार नव्हता व नाही. सदर आणेवारी लावताना वादी व प्रतिवादी नं. 9 ते 12 यांची आई कै. हौसाबाई विष्णु लंके हिचे नावे मुद्दामहुन वगळण्यात आले आहे.

7. सदर प्रतिवादी नं.3 ते 6 यांचे वडील पोपट बाळा वाळुंज यांनी घोडेगाव येथील मे. दिवाणी न्यायालय यांचेकडे सरस निरस मानाने वाटप करून मिळणेकामी प्रतिवादी नं.1, 7 व 8 व इतर इसमांविरूध्द रे.मु.नं.112/2005 हा दावा दाखल केला होता. सदर दाव्यात दावा जमीन मिळकतींचेदेखील वाटप मागण्यात आले होते. मुळात दावा मिळकत ही वादी नं.1 व प्रतिवादी नं.7 व 8 यांचे वडील व प्रतिवादी नं.9 ते 12 यांचे आजोबा (आईचे वडील) कै. वामन तुकाराम वाळुंज यांचे खरेदी मालकीहक्काची जमीन मिळकत असल्याने सदर जमीन मिळकतीबाबत वाटप मागणेचा पोपट बाळा वाळुंज यांना कोणतीही हक्क व हितसंबंध नव्हता व नाही. सदर दाव्यामध्ये कोणीही हजर न झाल्याने सदर दावा मे. न्यायालयाने दिनांक 29/09/2007 रोजी एकतर्फा मंजुर केला आहे व दावा जमीन व अन्य वडीलार्जीत जमीन मिळकतींमध्ये पोपट बाळा वाळुंज यांचा 1/3 हिस्सा ठरविण्यात आला आहे. सदर दाव्याचे कामी वादी व प्रतिवादी नं.9 ते 12 यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेले नव्हते व नाही. सबब सदर दाव्याची माहिती वादी यांना कधीही झालेली नाही. सदर वादी यांचे भाऊ प्रतिवादी नं.7 व 8 हे सुध्दा अशिक्षीत असल्याने त्यांनीसुध्दा दाव्याबाबत मे. कोर्टात उपस्थित राहुन बाजु मांडली नाही. सदर पोपट बाळा वाळुंज यांनी मे. न्यायालयाची दिशाभूल करून दावा जमीनीमध्ये त्यांचा कोणताही हक्क व अधिकार नसताना दावा जमीनीचे वाटप करून मागितले आहे.

8. सदर रे.मु.नं.112/2005 या दाव्याचा निर्णय दिनांक 29/09/2007 रोजी झालेनंतर पोपट बाळा वाळुंज यांनी हयात असेपर्यंत सदर रे.मु.नं.112/2005 ची अंमलबजावणी करणेकामी दरखास्त अथवा अर्ज दाखल केला नाही. सदर पोपट बाळा वाळुंज यांचे निधन झालेनंतर त्यांचे वारस प्रतिवादी नं.3 ते 6 यांनी रे.मु.नं.112/2005 चे निर्णयाची अंमलबजावणी करणेकामी दिवाणी किरकोळ अर्ज नं.28/2024 हा दाखल केला. सदर

दिवाणी किरकोळ अर्जाचे नोटीस या वादी यांचे भाऊ प्रतिवादी नं.7 व 8 यांना मिळालेनंतर वादी यांना पोपट बाळा वाळुंज यांनी घोडेगाव येथील दिवाणी न्यायालयामध्ये दाखल केलेल्या रे.मु.नं.112/2005 ची माहिती मिळाली. सदरवेळी वादी यांनी प्रतिवादी नं.1 ते 6 यांचेकडे जावून दावा जमीन ही वादी व प्रतिवादी नं.7 व 8 यांचे वडील व प्रतिवादी नं.9 ते 12 यांचे आजोबा (आईचे वडील) कै. वामन तुकाराम वाळुंज यांची स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची जमीन असून सदर जमीनीशी प्रतिवादी नं.1 ते 6 यांचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही असे सांगितले असता प्रतिवादी नं.1 ते 6 यांनी वादी यांचे बोलण्याकडे दुर्लक्ष करून दावा जमीनीमध्ये आमचा हिस्सा असून आम्ही तो मिळवणारच, तुम्हाला काय करायचे ते करा अशी भाषा वापरली. सबब वादी यांना त्यांचे न्यायहक्कासाठी सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

9. <u>दाव्यास कारण</u> - सदर दाव्यातील वादी यांना पोपट बाळा वाळुंज यांनी घोडेगाव येथील न्यायालयामध्ये केलेल्या रे.मु.नं.112/2005 या दाव्याची माहिती मिळालेनंतर वादी यांनी संपुर्ण कागदपत्रे काढून प्रतिवादी नं.1 ते 6 यांचेकडे जावून दावा जमीन ही वादी नं.1 व प्रतिवादी नं.7 व 8 यांचे वडील व प्रतिवादी नं.9 ते 12 यांचे आजोबा (आईचे वडील) कै. वामन तुकाराम वाळुंज यांची स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची जमीन असून सदर जमीनीशी प्रतिवादी नं.1 ते 6 यांचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही असे सांगितले असता प्रतिवादी नं.1 ते 6 यांनी वादी यांचे बोलण्याकडे दुर्लक्ष करून दावा जमीनीमध्ये आमचा हिस्सा असून आम्ही तो मिळवणारच, तुम्हाला काय करायचे ते करा अशी भाषा वापरली.

10. <u>दाव्याची आकारणी</u> - दावा ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमाचा असल्याने दाव्याची किंमत रक्कम रूपये 2000/- रूपयांवर केली असुन त्यावर योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प दिलेला आहे.

11. <u>दाव्याचे अधिकारक्षेत्र</u> - दावा जमीन ही गाव मौजे खडकवाडी, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील मे. कोर्टाचे अधिकारक्षेत्रात येत असल्यामुहे सदर दावा चालविणेचा व त्यावर निर्णय देणेचा या मे. कोर्टास पुर्ण अधिकार आहे.

12. प्रतिवादींची कैफियत आल्यावर जरूर वाटल्यास वादीला दावा दुरूस्त करण्याची परवानगी असावी.

13. <u>तरी वादीची मे. कोर्टास विनंती की,</u>

अ. वादीचा दावा मंजुर करण्यात यावा.

ब. सदर दावा जमीन मिळकत ही वादी व प्रतिवादी नं.7 ते 12 यांची मालकीची जमीन मिळकत असलेबाबतचा ठराव करण्यात यावा.

क. सदर रे.मु.नं.112/2005 मधील हुकुमनामा वादी व प्रतिवादी नं.7 ते 12 यांचे मालकीचे दावा जमीन मिळकतीवर बंधनकारक नाही, वादी व प्रतिवादी नं.7 ते 12 यांच्या मालकीच्या दावा जमीन मिळकती सदर रे.मु.नं.112/2005 या दाव्यातील हुकुमनाम्यातून कमी करण्यात याव्यात व तसा अहवाल मा. जिल्हाधिकारी सो., पुणे यांना पाठविण्याचा आदेश व्हावा असा ठराव करून मिळावा.

ड. सदर दाव्याचा निर्णय होईपर्यंत प्रतिवादी नं.1 ते 6 यांनी दावा जमीनींची विक्री, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिस असे कोणत्याही तबदीलीचे व्यवहार करू नये अशी निरंतर ताकीद प्रतिवादी नं.1 ते 6 यांचेविरूध्द देवविण्यात यावी.

इ. इतर योग्य व न्यायाचे आदेश पारीत करण्यात यावेत.

घोडेगाव

दि. 16/6/2025

स. नि. डा. हा.
श्री. गिरजाबाई
सिताराम
यांचा

वादी

वादीतर्फे ॲडव्होकेट

# <u>प्रतिज्ञालेख</u>

मी गिरजाबाई सिताराम आदक वय 82 वर्षे, धंदा शेती, रा.वाळुंजनगर पो.लोणी, ता.आंबेगाव, जि.पुणे सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की, वर दावा कलम 1 ते 13 मध्ये नमुद केलेला सर्व मजकुर खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेकामी आज रोजी घोडेगाव मुक्कामी त्यावर सही केली असे.

घोडेगाव

दि. 11/6/2025

प्र.नि.अ.हा.अं.-
गिरजाबाई सिताराम
आदक यांचा

वादी

RCS 128.2025 Exh.01

Order

Issue summons to defendants.

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2025.07.03 11:23:02 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

CJJD, Ghodegaon